# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट

दिनांक ०९/१०/२०२२

**‘‘ अवैध सावकारीचा व्यवसाय करणा-या सराईत गुन्हेगारावर कारवाई केलेबाबत. ’’**

मा. पोलीस आयुक्त श्री. अकुंश शिंदे सो, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या आदेशान्वये सावकारी कक्ष स्थापन करुन त्या संदर्भातील गुन्हयांचा व अर्जाचा तपासाबाबत आदेशित केल्याने त्याबाबत फिर्यादी हे मा. पोलीस आयुक्त सो यांना भेटुन तक्रारी अर्ज केला असता सदर अर्जाची चौकशी सावकार कक्ष करीत असताना चौकशी अंती सराईत गुन्हेगार दिपक वाल्मिक सुर्यवंशी रा.बिजलीनगर, चिंचवड पुणे याच्या कडुन फिर्यादी यांनी त्यांचा बांधकाम व्यवसाय असून बांधकाम व्यवसायासाठी फिर्यादी यांना पैशाची गरज असल्याने त्यांनी दिपक वाल्मिक सुर्यवंशी रा.बिजलीनगर, चिंचवड पुणे याच्याकडून सन २०१५ मध्ये बांधकाम व्यवसायासाठी द.मा.द.शे १० टक्के व्याजाने ६,००,०००/- रुपये घेतले होते. ते ठरल्या प्रमाणे फिर्यादी यांनी व्याजाचे पैसे परत न केल्याने आरोपी याने फिर्यादी यांना वारंवार फोन करुन, व्याजाचे पैसे न देण्याचे कारणावरुन जिवे मारण्याची धमकी भिती घालुन हात- पाय तोडण्याची धमकी देवुन व्याज व चक्रवाढ व्याज असे एकुण २७,६०,०००/- रुपये वसुल करुन तसेच फिर्यादी यांचे व त्यांचे वडीलांचे नावे असलेले तीन फ्लॅट आरोपी याने कागदपत्रे तयार करुन बळजबरीने नावावर करुन घेतलेचे तसेच पुन्हा २०,००,००० /- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झालेने आरोपी नामे **दिपक वाल्मिक सुर्यवंशी, रा. शिवनगरी, बिजलीनगर, चिंचवड पुणे याचे विरुध्द दिनांक ०८/१०/२०२२ रोजी चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं. ४७७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८६,५०४,५०६, सह महाराष्ट्र सावकारी कायदा-२०१४ चे कलम ३९,४५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष सह सावकारी कक्ष करीत असुन आरोपी यास अटक करण्यात आलेली आहे.**

सदर आरोपी विरुध्द या आधी १) चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं १५२/२०१० भा.द.वि.कलम ३०२,४५२,३६४ १४३,१४७,१४८,१४९, प्रमाणे (२) गुरनं ६९/२०१८ भा.द.वि.कलम १६० प्रमाणे (३) गुरनं ३१०/२०१५ भा.द.वि.कलम ३८७,५०६ सह महाराष्ट्र सावकारी कायदा २०१४ चे कलम ३९,४३,४४,४५ प्रमाणे गुन्हे दाखल असुन सराईत गुन्हेगार आहे.

**तसेच आरोपी नामे दिपक वाल्मिक सुर्यवंशी, रा. शिवनगरी, बिजलीनगर, चिंचवड पुणे व इतरही सावकारांनी सावकारी अवैध धंदा करुन कर्जदारास वेठीस धरुन व्याज,चक्रवाढ व्याज वसुल करत असतील तसेच सावकाराने अवैद्यरित्या कर्जदाराची मालमत्ता हडप करणे, कर्जावर अवास्तव दराने व्याज आकारणे, बळाचा वापर करणे, इतरही त्रास देणे, सावकारी लायसन्स व्यतिरिक्त अन्य रितीने सावकारीचा धंदा करत असेल तसेच बेकायदेशिर सावकाराचे व्यवहार करणा-यांवर तक्रार देण्याचे आवाहन पोलीसांनी केलेले आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.अकुंश शिंदे सो, मा.अपर पोलीस आयुक्त श्री डॉ. संजय शिंदे सो, मा.पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), श्री. डॉ. काकासाहेब डोळे, सो., मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे-०१) श्री. पद्माकर घनवट, सो., मा.सहा.पोलीस आयुक्त श्री. डॉ.प्रशांत अमृतकर सो यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि (श्रेणी) विजय कांबळे, पोलीस अंमलदार कल्याण महानोर,सुनिल शिरसाट, सुधा टोके, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, यांनी केलेली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उपायुक्त, (गुन्हे)
पिंपरी चिंचवड.